दैनिक हेराल्ड 24/3/15

# ‘पर्यावरण आणि विकास’ विषयावर दोडामार्ग महाविद्यालयात चर्चासत्र

**दोडामार्ग, दि. २३ (प्रतिनिधी):**

दोडामार्ग येथील नवनिर्माण शिक्षण संस्था संचालित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात भारतीय सामाजिक अनुसंधान परिषद (आय.सी.एस.एस.आर.) मुंबईच्या वतीने दि. २६ व २७ मार्च रोजी 'पश्चिम घाट-जागतिक वारसा', 'पर्यावरण आणि विकास' या विष्यावर दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

युनेस्कोने अलिकडेच पश्चिम घाटाचे जागतिक पर्यावरण दृष्ट्या महत्त्व लक्षात घेऊन जागतिक वारसा यादीत पश्चिम घाटाचा समावेश केलेला आहे. या पार्श्वभूमीवर दक्षिण भारताच्या व महाराष्ट्राच्या विकासाच्या दृष्टीने पश्चिम घाटाचा कशा पद्धतीने उपयोग करता येईल याचा अभ्यास, चिंतन व मनन व्हावे हा उद्देश समोर ठेवून चर्चासत्राचे आयोजन केले आहे.

पश्चिम घाटासंदर्भात माधव गाडगीळ समिती व कस्तुरीरंगन समिती यांच्या बहुचर्चित अहवालावरही तज्ज्ञ आपली मते मांडणार आहेत. शिवाय पश्चिम घाटाचे पर्यावरण अबाधित ठेऊन त्याचा सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने कसा लाभ घेता येईल यावरही प्रामुख्याने चर्चा होणार आहे.

या चर्चासत्रामध्ये पश्चिम घाटातील संपन्न जैवविविधता, वनऔषधी वनस्पतींचा विकास, जंगलाचा होत असलेला ऱ्हास, पारंपरिक उर्जा निर्मिती स्त्रोत, खाण व्यवसाय, धरणे, रस्ते आणि शेती क्षेत्राचा विकास, नविन वसाहती, पर्यटन विकास, जल व्यवस्थापन इत्यादी विषयांवर सखोल चर्चा होणार आहे.

या चर्चासत्रामध्ये पालघर कॉलेजचे प्राचार्य डॉ. हेमंत पेडणेकर, डॉ. अंबादास जाधव, (मुंबई विद्यापीठाचे भूगोल विभाग प्रमुख) डॅ. नंदकुमार सावंत, (भुगोल विभाग प्रमुख, चौगुले कॉलेज गोवा) डॉ. प्रवीण कुमार रथ, (भुगोल विभाग प्रमुख शासकिय कॉलेज गोवा), डॉ. अभय पाटील (आर. पी. डी. कॉलेज बेळगाव), डॉ. एच बी. राठोड (चेअरमन भूगोल अभ्यास मंडळ, स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड), डॉ. मीना पोद्दार (भूगोल विभाग प्रमुख, शिवाजी विद्यापिठ, कोल्हापूर), डॉ. सुभाषिक मंडल (विश्वभारती विद्यापीठ, पंश्चिम बंगाल), डॉ. बबन इंगोले (मुख्य संशोधक, सागर विज्ञान संस्था गोवा), डॉ. सोनल कुमार (भूगोल विभाग प्रमुख, एरणाकुलम-केरळ), डॉ. ओमप्रकाश शहापूरकर (भूगोल विभाग प्रमुख, शाहू महाविद्यालय - लातूर) इत्यादी मान्यवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन होणार आहे.

महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा, केरळ, पश्चिम बंगाल बरोबरच देशाच्या अन्य राज्यातील १०० पेक्षा अधिक पर्यावरण अभ्यासक यामध्ये सहभागी होणार आहेत. चर्चासत्राचा प्रारंभ गुरुवार दि. २६ मार्च २०१५ रोजी सकाळी १०.०० वा. होणार असून, या चर्चासत्राच्या उद्घाटनासाठी मुख्यमंत्री मा. लक्ष्मीकांत पार्सेकर यांना निमंत्रित करण्यात आले आहे. तर शुक्रवार दि. २७ मार्च रोजी होणाऱ्या समारोप समारंभास पर्यावरण चळवळीतील अग्रणी प्राचार्य डॉ. एम. आय. बाचूळकर उपस्थित राहणार आहेत.

या चर्चासत्राचे समन्वयक म्हणून प्रा. डॉ. पी. डी. गाथाडे तर सहसमन्वयक म्हणून प्रा. एस. एन. जाधव हे जबाबदारी पार पाडणार आहेत. चर्चासत्रामध्ये सहभाग नोंदणीसाठी प्रा. एस. एन. जाधव (९८८१५६०५९६) व प्रा. श्रीपाद पाडगांवकर (९४२३६८७७४४) यांच्याशी संपर्क साधावा.

या चर्चासत्रात देशाच्या विविध भागातील प्राध्यापक, पर्यावरण तज्ज्ञ या चळवळीतील कार्यकर्ते व पर्यावरणप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असून स्थानिक पर्यावरणप्रेमींनीही या चर्चासत्राचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी केले आहे.